“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार”

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# राजे रामराव महाविद्यालय, जत


ता. जत जि. सांगली - ४१६४०४

फोन नं. (०२३४४) २४६२५१

Email : rajeramrao@gmail.com Website : www.rrcollege.org


NAAC Re-accredited with Grade **'B'** (CGPA 2.30 Third Cycle)




# माहितीपत्रक

## 2023-24

### • वरिष्ठ विभाग •

(कला, वाणिज्य, विज्ञान, बी.सी.ए. आणि पदव्युत्तर)

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

–शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित**

# राजे रामराव महाविद्यालय जत जि. सांगली

## प्रास्ताविक

महाराष्ट्राचे आधुनिकीकरण व सर्वगामी विकास करण्यासाठी ज्या व्यक्ती चंदनाप्रमाणे झिजल्या त्यांची एक थोर परंपरा आहे. ही दैदिप्यमान परंपरा महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठठल रामजी शिंदे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर, कर्मवीर भाऊराव पाटील व शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे अशी आहे.

या परंपरेतील शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' हे ध्येय उराशी बाळगून कराडच्या कृष्णा कोयनेच्या संगमावर मुरलीधराच्या साक्षीने शिक्षण प्रसाराच्या पवि़त्र कार्यास प्रारंभ करून दि. 19 ऑक्टो 1954 साली श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. प्रारंभी फक्त पाच शाळा सुरू करणाऱ्या डॉ. बापूजी साळुंखे यांनी अल्पावधीत शाळा, महाविद्यालये, अध्यापक विद्यालये, व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रम, वसतीगृहे इत्यादी 406 पेक्षा आधिक सांस्कृतिक केंद्रे महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या ग्रामीण भागात सुरु करून ज्ञानदानाचा इतिहास घडविला. आज संस्थेत दहा हजाराहून अधिक गुरूदेव कार्यकर्ते ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत असून सुमारे दोन लाखापेक्षा अधिक विद्यार्थी विद्यार्थिनी विद्यार्जन करीत आहेत.

स्वातंत्र्यानंतर स्वराज्याचे स्वप्न पाहणाऱ्या नव्या पिढीला गतीमान शिक्षण देण्यासाठी उच्चशिक्षणाच्या सुविधा देणे गरजेचे आहे याची जाण बापूजींना झाली. बापूजी आणि संस्थामाता श्रीमती सुशिलादेवी साळुंखे हे संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांचे माता पिता बनले. शिक्षणाचे अविरत कार्य करताना बापूजींना अनंत अडचणी आल्या, परंतु ध्येयनिष्ठा आणि सत्यनिष्ठेपुढे त्या तोकडया, थिटया पडल्या आणि महाराष्ट्रभर श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची ज्ञानकेंद्रे विकसीत होऊ लागली, त्याच्या कार्यात असंख्य गुरूदेवकार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते सामील झाले. बापूजींच्या पावलांचा स्पर्श ज्या गावांना झाला ती गावे बापूजीमय, संस्थामय बनली. आज महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्याच्या एकूण तेरा जिल्हयामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात 24 वरीष्ठ महाविद्यालये सहीत एकूण 406 सांस्कृतिक केंद्रे ज्ञानदानाचे अखंडीत कार्य 10 हजार गुरूदेवकार्यकर्त्यांच्या माध्यमातून करीत आहेत. महाराष्ट्रात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे नाव गुणवत्तेच्या

क्षेत्रात आघाडीवर आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा आशीर्वाद, संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांचे मातृत्वाचे छत्र आणि संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांची सदयता, दूरदृष्टी व कुशल नेतृत्व यामुळे ही गरूड भरारी घेऊ शकली. महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राचा इतिहास लिहताना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या, शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे व संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या त्यागाचा सुवर्णक्षरांनी लिहावा असाच आहे.

प्रगती आणि किर्तीचा मंगल कलश सदैव हाती असणाऱ्या सांगली जिल्हयाच्या विकासात शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे. डॉ.बापूजी साळुंखे आणि सांगली जिल्हयाचा जिव्हाळा अतुलनीय असून बापूजींच्या पदस्पर्शाने जिल्हयात ज्ञानगंगोत्री विविध संस्कार केंद्राच्या माध्यमातून आली. जत तालुका तसा अवर्षणग्रस्तच. या अवर्षणग्रस्त भागात ज्ञानगंगोत्री घरोघरी पोहचावी, ज्ञानसूर्याचा लख्ख प्रकाश पडून संपूर्ण तालुक्याचे शैक्षणिक उत्थान व्हावे या आंतरिक जाणीवेने जत संस्थानचे श्रृतकीर्त थोरवीचे भूतपूर्व नरेश श्रीमंत विजयसिंहराजे डफळे यांनी इमारतीसह 23 एकरांचा भव्य परिसर श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेस दान दिला. श्रीमंत राजेसाहेबांचे उदार दातृत्व आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक, संस्थापक व थोर शिक्षणतज्ञ डॉ. बापूजी साळुंखे यांची जिध्द व चिकाटी यातून जत येथे जून 1969 मध्ये **राजे रामराव महाविद्यालय** आकारास आले. 50 वर्षापूर्वी लावलेल्या इवल्याशा रोपटयाने आज महाकाय वृक्षाचे रूप घेतले आहे. 70 विद्यार्थ्यांच्यावर चालू झालेल्या ह्या महाविद्यालयात आज 2500 हून अधिक विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. या महाविद्यालयाची दिवसागणिक होणारी प्रगती, वाढणारा लौकिक शिवाजी विदयापीठात गुणवत्तेची यशोगाथा नेहमीच अभिमानास्पद राहिली आहे.

महाविद्यालयाचा आज शिवाजी विद्यापीठात गुणवत्तेचा जो गौरव होतो आहे. त्यापाठीमागे संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांची दूरदृष्टी कारणीभूत आहे. त्यांनी विद्यार्थी हा विकासाचा केंद्रबिंदू मानून संस्थेचे सचिव असल्यापासूनच गाढा व्यासंग असलेले प्राध्यापक व महाविद्यालयाच्या विकासाला सहायभूत असे प्राचार्य नियुक्त केले. मी महाविद्यालयाचा प्र. प्राचार्य या नात्याने कार्यभार घेतल्यानंतर अनेक योजना पुढे येत आहे. अशा अवस्थेत लवकरच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने हे महाविद्यालय सुसज्ज होईल. नजिकच्या काळात या महाविद्यालयाचे नॅक समितीकडून पूर्नमूल्यांकन होणार असून मला आत्मविश्वास आहे की आम्ही चांगले मानांकन नक्कीच मिळवू. महिला वसतिगृहाच्या माध्यमातून उच्च शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलींची सोय आम्ही केल्याने मुलींची संख्याही विद्यार्थी संख्येपेक्षा अधिकच झाली आहे, हे महाविद्यालय विकसीत होत असताना आमच्या संस्थेचे

संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा अशिर्वाद संस्थेचे, कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे नेतृत्व, संस्था सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांच्या मार्गदर्शन या परिसरातील राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, संस्थेचे हितचिंतक, महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे शिवाजी विद्यापीठ क्षेत्रात महाविदयालय गुणवत्तेच्या क्षेत्रात अग्रेसर आहे. विद्यार्थी मित्रानो ,आज महाविद्यालयात प्रवेशासाठी स्पर्धा आहे. आपण वेळीच महाविद्यालयात प्रवेश घेतला तर भविष्यात अडचणी येणार नाहीत, हे महाविद्यालय शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी तुमच्या भाविष्यासाठी सुरू केले आहे. मी या महाविद्यालयाच्या प्राचार्य या नात्याने महाविद्यालयाच्या प्रगतीस सदैव कटिबध्द राहीन, अशी ग्वाही देतो.

**प्रा. डॉ. सुरेश एस. पाटील**
प्र. प्राचार्य

## ❖ महाविद्यालयातील सुविधा व उपक्रम –

1. महाविद्यालयात सुसज्ज ग्रंथालय व अभ्यासिकेची सोय आहे.
2. भव्य क्रिडांगण, विविध देशी–विदेशी खेळाचे साहित्यानियुक्त सुसज्ज जिमखाना, 400 मीटर रनिंग ट्रॅक तसेच होतकरु विद्यार्थ्यांना विविध खेळाच्या सरावासाठी मार्गदर्शन.
3. सांस्कृतिक मंडळामार्फत विद्यार्थ्यांना गायन, वादन, लोकनृत्य, लोकगीत वगैरे स्पर्धेमध्ये भागासाठी मार्गदर्शन.
4. विद्यापीठ स्तरावर विविध ठिकाणी होणा–या वाद–विवाद, वक्तृत्व, निबंध स्पर्धेत भागघेणेसाठी होतकरू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.
5. वार्षिक नियतकालिक 'रामविजय' दरवर्षी प्रसिध्द केले जाते. त्यामध्ये कथा, कविता, लेख तसेच फोटोग्राफी, चित्रकला इत्यादी विपुल साहित्याव्दारे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो.
6. 300 विद्यार्थ्यांचा सहभाग असलेले राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S) युनिट.
7. 94 विद्यार्थ्यांसाठी एन.सी.सी (N.C.C) युनिट आहे त्याची प्रवेश प्रक्रिया 16 महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. सांगली यांचे मार्फत होते.
8. महाविद्यालयाच्या कार्यक्रम विभागामार्फत दरवर्षी प्रसिध्द लेखक, कवी, शास्त्रज्ञ व विचारवंतांची व्याख्याने आयोजित केली जातात.
9. नोकरी व व्यवसायाविषयी मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांना वैयक्तिक तसेच एकत्रित प्रशिक्षण वर्ग तसेच विशेष सूचना फलक लावून माहिती पुरविली जाते.
10. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन.शैक्षणिक वर्षाच्या शेवटी केले जाते.

11. शैक्षणिक सहली, ट्रॅकिंग याव्दारे विद्यार्थ्यांचे निसर्गाशी नाते निर्माण केले जाते.

12. विद्यार्थ्यासाठी विमा (विद्यापीठ) योजनेची सोय आहे.

13. महाविद्यालयात सी.सी.टी.व्ही. असल्याने विद्यार्थी पूर्णपणे सुरक्षित आहेत.

14. महाविद्यालयातील परीक्षा विभागामार्फत अंतर्गत मुल्यमापन करणेची सोय आहे.

15. विविध व्यवसायाभिमूक प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची सोय आहे.

### ❖ ग्रंथालयाबाबत विशेष माहिती :

महाविद्यालय परिसरात सुसज्ज ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये जवळपास 80,000 ग्रंथ, 65 साप्ताहिके उपलब्ध आहेत. सदर ग्रंथालयात दुर्मिळ संदर्भ ग्रंथ, साप्ताहिके, विद्यार्थी अभ्यासिका व प्रशासन असे विभाग आहेत.

### ❖ ग्रंथालयातील सुविधा व उपक्रम पुढीलप्रमाणे :

1. 100 विद्यार्थी क्षमतेची स्वतंत्र अभ्यासिका व विद्यार्थ्यांसाठी वाचन कट्टयाच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध.
2. गुणवत्ताधारक व गरीब विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तकांचा संच उपलब्ध होईल.
3. विदयार्थांची वाचण्याची आवड निर्माण होणेसाठी **‘एक तास ग्रंथालयात ’**हा प्रभावी उपक्रम राबविला जातो

## ❖महाविद्यालयाचे नियम –

1. कॉलेजमधील प्रत्येक तासाला व प्रात्यक्षिकासाठी नियमित व वेळेवर उपस्थित असले पाहिजे. विद्यापीठ नियमानुसार महाविद्यालयात तासाला 80% उपस्थिती आवश्यक आहे अन्यता टर्म ग्रॅन्ट न झाल्याने विद्यापीठ परीक्षेस बसता येणार नाही.
2. कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याजवळ स्वतःचे ओळखपत्र (Identity Card) असणे आवश्यक आहे. ओळखपत्र न हरविण्याची दक्षता विद्यार्थ्यांनी घ्यावी. कॉलेज आवारात प्रवेश करताना प्रत्येक विद्यार्थ्याजवळ आपले ओळखपत्र असणे सक्तीचे राहील. ज्या विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र नसेल त्या विद्यार्थ्यावर महाविद्यालय कायदेशीर कारवाई करेल.
3. ओळखपत्र हरवल्यास रू.100/– दंड भरुन नवीन (Duplicate) ओळखपत्र दिले जाईल.
4. इतर वर्गांना आपल्या वर्तनाने कोणताही उपद्रव होणार नाही याची दक्षता घ्यावी.
5. महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेला व शिस्तीला बाधा होईल असे कोणतेही वर्तन विद्यार्थ्याने महाविद्यालयात अथवा महाविद्यालयाबाहेर करता कामा नये. आपण सी.सी.टी.व्ही. समोर आहात हे लक्षात घ्यावे.
6. महाविद्यालयाची www.rrcollege.org या वेबसाईट व नोटीस बोर्ड नियमित वाचण्याची विद्यार्थ्यांनी सवय ठेवावी.

7. महाविद्यालयाच्या परिसरात असभ्य वर्तन करणे, परीक्षा काळात गैरवर्तन केल्यास कठोर शिक्षा केली जाईल.
8. परीक्षा विभागामार्फत प्रत्येक सत्रासाठी अंतर्गत मुल्यमापन केले जाते ते विद्यार्थ्यांनी पूर्ण केले पाहिजेत.
9. महाविद्यालयात विविध विषयांचे व्यवसायभूमिक सर्टिफिकेट कोर्स सुरू आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक सेमिस्टर मध्ये एक असे वर्षातून दोन कोर्स पूर्ण करणे अनिवार्य आहे.
10. **कार्यालयाची वेळ** : सोमवार ते शुक्रवार सकाळी 10:00 ते सायंकाळी 05:30 पर्यंत व शनिवार सकाळी 10:00 ते दुपारी 02:30 पर्यंत अशी राहील. या वेळेमध्ये विद्यार्थ्यांनी आपली कामे करून घ्यावीत.
11. **महाविद्यालयाची वेळ** : कला व वाणिज्य वर्ग सकाळी 07:35 ते दुपारी 01:00 पर्यंत राहील. विज्ञान शाखेचे वर्ग सकाळी 10:30 ते दुपारी 04:30 पर्यंत राहील.यामध्ये काही कारणाने बदल होऊ शकतो.
12. ग्रंथालय अथवा प्रयोगशाळा डिपॉझिट प्रतिवर्षी 16 ऑगस्ट ते 15 ऑक्टोबर या कालावधीत परत मिळतील. वरील कालावधी व्यतिरिक्त डिपॉझिट परत मिळणार नाही. तसेच महाविद्यालय सोडल्यावर एक वर्षात डिपॉझिटची रक्कम परत न घेतल्यास लॅप्स झाल्याने रक्कम परत मिळणार नाही.
13. विद्यार्थ्यास कॉलेज बदल करावयाचे असल्यास अथवा बहि:स्थ म्हणून विद्यापीठाकडे रजिस्ट्रेशन करावयाचे असल्यास संबंधित कॉलेज अथवा विद्यापीठाकडे टी.सी. पाठविला जाईल. विद्यार्थ्यांना हातात (By hand) टी.सी. मिळणार नाही. यासाठी विद्यार्थ्यांनी ज्या ठिकाणी प्रवेश घेतला असेल तेथूनच टी.सी. मागणी अर्ज या महाविद्यालयाकडे पाठवावा.
14. विद्यार्थ्यास कार्यालयाकडून कागदपत्र हवे असल्यास दोन दिवस अगोदर संबंधित लेखनिकास भेटावे व तसा अर्ज प्राचार्या मार्फत करावा.
15. एन.सी.सी. मध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी एन.सी.सी. किटस् वर्षाअखेरीस सुस्थितीत परत करावी. तसेच नियमित परेडसाठी उपस्थित असले पाहिजे.
16. एन.एस.एस. मधील विद्यार्थ्यांनी नोटीसव्दारे कळविल्याप्रमाणे श्रमदान अथवा नियमित कार्यक्रमास हजर राहावे.

❖ **ग्रंथालयाचे नियम :**

1. विद्यार्थ्यास कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला म्हणजे तो ग्रंथालयाचा सभासद होण्यास पात्र ठरतो. सदर विद्यार्थ्यांस एक ग्रंथालय सभासद कार्ड देण्यात येते. जर हे कार्ड हरवले तर रू.50 भरून दुसरे कार्ड मिळविता येते.

2. ओळखपत्र व प्रवेश पावती सोबत आणल्याशिवाय ग्रंथालयात प्रवेश मिळणार नही.
3. प्रत्येक विद्यार्थ्यास डिमांड स्लिप मिळते. ग्रंथालयातील पुस्तके मिळविण्यासाठी प्रत्येक वर्गाकरिता विशिष्ट एक दिवस निश्चित केलेला असतो. विद्यार्थ्याने डिमांड स्लिप भरून आधी नेलेली पुस्तके निश्चित केलेल्या दिवसापूर्वी एक दिवस आधी ग्रंथालयात जमा करणे आवश्यक असते.
4. विद्यार्थ्यांना एका आठवडयाकरिता दोन पुस्तक देण्यात येते. जर एका आठवडयात विद्यार्थ्याने पुस्तक परत केले नाही तर त्यास पुढील प्रत्येक दिवसाकरिता दोन रूपये प्रमाणे दंड भरावा लागेल. तसेच ओळखपत्रावरील पुस्तकासाठी 1 रू व पुस्तक संचासाठी दररोज रू.5 दंड भरावा लागेल.
5. जर विद्यार्थ्याने पुस्तक हरविले किंवा त्याची काही पाने फाडली किंवा ते पुस्तक खराब केले असेल तर त्यास नवीन पुस्तक आणून ग्रंथालयात जमा करावे लागेल किंवा पुस्तकाच्या किंमतीच्या दुप्पट किंमत किंवा सदर पुस्तकाची सध्याची पूर्ण किंमत किंवा यापैकी जी रक्कम जास्त असेल ती भरावी लागेल.
6. संदर्भ ग्रंथ, विश्वकोश, शब्दकोश, अभ्यासक्रम सूची (सिलॅबस), प्रश्नपत्रिका संच, नियतकालिके, पाठयपुस्तके इ. विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत ओळख पत्रावर देण्यात येतात. तसेच विद्यार्थ्यांने ग्रंथालयातून/अभ्यासिकेच्या बाहेर जाण्यापूर्वी ती जमा करावीत. ती अभ्यासिके बाहेर नेता येणार नाहीत.
7. कॉलेज वेळोवेळी जे नियम करील त्याचे पालन विद्यार्थ्यांना करावे लागेल. सदर नियम ग्रंथालयातील काचफलकामध्ये पाहवयास मिळतील.
8. 'पुस्तक पेढी' (बुक बॅंक) योजनेतून कमिक पुस्तकांचा संच त्या पुस्तकाच्या किंमतीच्या 25% रक्कम भरून वर्षभर वापरण्यास दिला जातो. वर्षाच्या शेवटी सदर सर्व पुस्तके ग्रंथालयात जमा करावी लागतात.
9. आपल्या विषयाचा तास नसतो तेव्हा ग्रंथालयातील अभ्यासिकेत बसता येईल.

### ❖ प्रवेश रद्द करण्यासंबधीचे नियम :

महाविद्यालयातील प्रवेश रद्द करतांना विद्यार्थ्यांने आपला लेखी अर्ज व प्रवेशाची मूळ पावती सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर चार दिवसांनी प्रवेश रद्द केला जाईल, महाविद्यालयाकडे जमा असणारी मूळ कागदपत्रे व नियमानुसार परत करावयाच्या फी ची रक्कम चेकने अदा करण्यात येईल.

**बी.ए/बी.कॉम/बी.एस्सी व बी.सी.ए प्रथम वर्ष प्रवेशाबाबतचे नियम**

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज स्वीकारून महाराष्ट्र शासन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व संस्था यांच्या वेळोवेळी ठरविलेल्या नियमाप्रमाणे गुणवत्तेवर आधारीत प्रवेश दिला जाईल. त्याचे नियम पुढीलप्रमाणे–

1. प्रवेश ऑनलाईन पध्दतीने मुदतीत स्वीकारले जातील. या संदर्भातील सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईट वर ठेवण्यात येईल.
2. प्रवेशासाठी लागणाऱ्या खालील कागदपत्राची पूर्तता प्रवेश घेतानाच करावयाची आहे.

    अ) शाळा सोडल्याचा दाखल्याची मूळ प्रत व दोन साक्षांकित प्रती

    ब) 12 वी च्या परीक्षेच्या गुणपत्रकाची दोन साक्षांकित प्रती

    क) पा्त्रता प्रमाणपत्र अर्ज

    ड) पासपोर्ट साईजचा दोन फोटो

    इ) जातीचा दाखला

    ई) सवलतीचे अर्ज व त्यास पूरक कागदपत्रे व त्याच्या दोन प्रती

    प) आधार कार्ड झेरॉक्स

    फ) इ.10 वी चे बोर्ड सर्टिफिकेटची दोन साक्षांकित प्रती

    ब) मतदान ओळखपत्र एक साक्षांकित प्रत.

    भ) राष्ट्रीयकृत बॅक पासबुक झेरॉक्स (बॅक ऑफ महाराष्ट्र)

    म) प्रवेश अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची गुणानुक्रमे यादी तयार केली जाईल. त्यामध्ये अनुदानित व विनाअनुदानित तुकडयामध्ये त्यांची नावे गुणानुक्रमे समाविष्ट केली जातील. सदर यादी महाविद्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केली जाईल.
3. गुणवत्तेनुसार प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना शासन व विद्यापीठाच्या वेळोवेळी लागू होणाऱ्या नियमानुसार फी भरावी लागेल.
4. 12 वी परीक्षा आर्टस मधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बी.ए मध्ये प्रवेश मिळेल, 12 वी कॉमर्स मधुन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बी.ए/बी.कॉम मध्ये प्रवेश मिळेल व 12 आर्टस, कॉमर्स व सायन्स मधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बी.सी.ए मध्ये प्रवेश मिळेल तसेज 12 वी सायन्स मधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बी.एस्सी मध्ये प्रवेश मिळेल.
5. बी.ए, बी.कॉम, बी.एस्सी, बी.सी.ए. भाग 1, 2 व 3 या सर्व वर्गासाठी अनुदानित व विनाअनुदानित तुकडया असतील.
6. प्रवेश देताना शासनाने दिलेल्या आरक्षणानुसार प्रवेश निश्चित केले जातील.त्याबरोबरच त्या त्या प्रवर्गामध्ये विद्यार्थीनीसाठी समांतर 30% व माजी सैनिकांच्या पाल्यासाठी 10% प्रवेश राखीव राहील.

| Sr.No | Category of Reservation | Percenate Reservation |
|---|---|---|
| 1 | Scheduled Castes and Schedule cast to Buddhism ( SC) | 13.0% |
| 2 | Scheduled Tribes (ST ) | 7.0 % |
| 3 | Vimukta jati (VJ) /De notified Tribes ( DT) (NT-A) | 3.0% |
| 4 | Nomadic Tribes 1 ( NT- B) | 2.5 % |
| 5 | Nomadic Tribes 2 ( NT- C) | 3.5 % |
| 6 | Nomadic Tribes 1 ( NT- D) | 2.0 % |
| 7 | Other Backward Classes ( OBC) | 19.0 % |
| 8 | Economically weaker section (EWS) | 10% |
| 9 | Open | 40% |

7. डी. एड. झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशावेळी एस.एस.सी परीक्षा इंग्रजीसह उत्तीर्ण झालेले मूळ गुणपत्रक व दोन सत्य प्रती, डी.एड. कॉलेज सोडल्याचा दाखल्याची मूळ प्रत व दोन साक्षांकित प्रती, डी.एड. उत्तीर्ण झालेले मूळ गुणपत्रक व दोन साक्षांकित प्रती व पासपोर्ट साईज दोन फोटो देणे आवश्यक आहे.
8. प्रथम वर्षात प्रवेश घेणा–या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जासोबत पात्रता प्रमाणपत्र अर्ज भरावा. त्यासाठी विद्यापीठाने आकरलेल्या पा़त्रता शुल्क वेगळे भरावे लागेल. विद्यापीठाकडून प्रवेश पात्रता झाल्यानंतरच वरील वर्गात प्रवेश निश्चित होतो. म्हणून विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाबरोबरच पात्रता प्रमाणपत्र अर्ज भरावा अन्यथा प्रवेश रध्द केला जातो याची नोंद घ्यावी.
9. प्रवेश घेतल्यानंतर मुळ दाखला परत मिळत नाही त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःजवळ दाखल्याच्या पुरेशा (किमान 10) सत्य प्रति व स्कॅन कॉपी काढून ठेवाव्यात.
10. जात प्रमाणपत्र, पडताळणी अथवा शिष्यवृत्तीच्या अर्ज भरणेसाठी मूळ दाखला व गुणत्रीकेची आवश्यक असते म्हणून वेळीच वरील सूचनेची नोंद घ्यावी.
11. महाविद्यालयामध्ये कोणत्याही वर्गात प्रवेश देण्याबाबतचे अथवा प्रवेश नाकारण्याचे अंतिम अधिकार प्राचार्यांना राहतील.

❖ **बी.ए / बी.कॉम / बी.एस्सी व बी.सी.ए. भाग 2 व 3 या वर्गाच्या प्रवेशसाठी सुचना.**

1. मागील परीक्षा उत्तीर्ण केलेल्या गुणपत्रिकेची एक साक्षांकित सत्य प्रत.
2. शिवाजी विद्यापीठ कक्षेतील अन्य महाविद्यालयातून परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी टी. सी. मागणी अर्ज कार्यालयातून घेऊन योग्य त्या माहितीसह प्रवेश अर्जास जोडावा. तसेच त्या सोबत संबंधित कॉलेजची टी.सी. फी म्हणून आय.पी.ओ. रु.75/– भरावी लागेल.

❖ **फी सवलती संबंधी सुचना –**

महाविद्यालयाची फी माफीसाठी विद्यार्थ्यांना सरकारकडून मिळणा–या खालील प्रकारच्या एकाच फी माफी सवलतीचा लाभ घेता येईल.

1. **ई.बी.सी. :** ज्या विद्यार्थ्यांचे पालकांचे उत्पन्न रु.8,00,000/– पेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.
2. **पी.टी.सी :** ज्या विद्यार्थ्यांचे आई अथवा वडील प्राथमिक शिक्षक आहेत अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.
3. **एस.टी.सी :** ज्या विद्यार्थ्यांचे आई अथवा वडील 5 वी ते 7 वी पर्यंत डी.एड. स्केलवर शिक्षक म्हणून काम करतात अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.
4. **फ्रिडम फायटर** : ज्या विद्यार्थ्यांचे आई वडील स्वातंत्र्यसैनिक होते अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.
5. **एक्स जवान :** ज्या विद्यार्थ्यांचे वडील पूर्वी मिलिटरी सेवेमध्ये होते, त्यांनी अर्जासोबत जिल्हा सैनिक बोर्डाकडून मिळणारे प्रमाणपत्र जोडून या सवलतीचा अर्ज केल्यास फक्त फी माफी मिळते. (12 वी पर्यंत गणवेश तसेच पुस्तकासाठी अनुदान मिळते.)
6. **जवान** : ज्या विद्यार्थ्यांचे वडील मिलिटरी सेवेमध्ये आहेत. अशांनी विहित नमुन्यात अर्ज करावा व त्यासोबत वडील मिलिटरी सेवेमध्ये असल्याबाबतचा जिल्हा सैनिक बोर्डाकडून मिळणारा दाखला जोडावा.

❖ **भारत सरकार शिष्यवृत्या संबधी माहिती –**

मागावर्गीय विद्यार्थ्यांना (अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त व भटक्या जमाती) भारत सरकारकडून शिष्यवृत्ती मिळते. त्यासाठी ऑनलाईन अर्ज भरावा लागेल. शिष्यवृत्ती संदर्भात वेळोवेळी नोटीस लावली जाते. त्या सर्व नोटीस विद्यार्थ्यांनी स्वतः काळजीपूर्वक वाचणे व त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

❖ **गुणी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती :**

राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती, राज्य सरकारची शिष्यवृत्ती, अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांना मिळणारी हिंदी शिष्यवृत्ती, विद्यापीठ मेरीट शिष्यवृत्ती, विद्यापीठ सामाजिकशास्त्रे शिष्यवृत्ती, अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी अपंग शिष्यवृत्ती, राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती इ. विविध शिष्यवृत्यांसाठी अर्ज करावा.

❖ **विद्यार्थी सहाय्यता निधी (एस.ए.फंड) :**

अत्यंत गरीब परंतू हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना काही प्रमाणात गरजेप्रमाणे मदत केली जाते. संबंधित गरजू विद्यार्थ्यांनी मा. प्राचार्यांना भेटून याचा लाभ घ्यावा.

# महाविद्यालयातील अभ्यासक्रम

## ▪ कला शाखा (Arts Faculty)

- **प्रथम वर्ष कला ( बी.ए भाग 1)**

प्रत्येक विद्यार्थ्यास एकूण सहा विषय घ्यावे लागतात. त्यापैकी दोन आवश्यक व चार ऐच्छिक विषय निवडावेत.

**आवश्यक विषय (Compulsory) दोन**

1) इंग्रजी 2) मराठी किंवा हिंदी

**ऐच्छिक विषय (Optional)** चार,

खालील अ गटातील एक व ब गटातील कोणतेही तीन विषय निवडावेत.

| **गट अ** | **गट ब** |
|---|---|
| 1) इंग्रजी | 1) अर्थशास्त्र |
| 2) मराठी | 2) इतिहास |
| 3) हिंदी | 3) भूगोल |
| | 4) राज्यशास्त्र |

**सत्र 1**

Compulsory Civic Course: Democracy Elections and Good Governance

Certificate Course: Certificate Course in Human Rights

**सत्र 2**

Skill Development Course (SDC): Á Personality Development

Certificate Course:

Certificate Course in Indian Constitution

**टीप –**

1. मराठी, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र या विषयांच्या दोन तुकडया पूर्ण झाल्यानंतर या विषयांना प्रवेश मिळणार नाही.
2. कोणत्याही कारणास्तव घेतलेले विषय बदलून मिळणार नाही.
3. बी.ए.भाग 1 ला निवडलेल्या चार ऐच्छिक विषयापैकी बी.ए. भाग 2 ला दोन ऐच्छिक विषय निवडता येतील. बी.ए. भाग 2 ला निवडलेल्या दोन ऐच्छिक विषयापैकीच बी.ए भाग 3 ला एक स्पेशल विषय निवडावा लागतो. हे लक्षात घेऊनच विद्यार्थ्यानी बी.ए. भाग 1 साठी विषयाची निवड काळजीपूर्वक करावी.

4. शिवाजी विद्यापीठाने सन 2018–19 पासून बदललेल्या नियमानुसार निवड प्रदान श्रेयांकन पध्दत Choice Based Credit System (CBCS ) सुरू केली आहे. तसेच श्रेयांकाशिवाय स्वयंम अध्ययन अभ्यासक्रम Non–Credit Self Study Course प्रत्येक सेमिस्टरसाठी एक विषय निवडावयाचा आहे.

- **व्दितीय वर्ष कला ( बी.ए भाग 2)**

**आवश्यक विषय (Compulsory)**

1) इंग्रजी

2) पर्यावरण अभ्यास (Environmental Studies)

3) आय.डी.एस. (सदर विषय निवडीसाठी खालील टेबल पहावा)

निवडलेल्या दोन ऐच्छिक विषयांशी शिवाजी विद्यापीठाने निश्चित केलेला सुसंगत आय.डी. एस. विषय पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | निवडलेले ऐच्छिक विषय | सुसंगत आय.डी.एस. विषय |
|---|---|---|
| 1 | अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास | सहकार (Co- operation) |
| 2 | इंग्रजी किंवा हिंदी | मराठी साहित्याचा इतिहास ( History of Marathi Litersture ) |
| 3 | मराठी, इतिहास, राज्यषास्त्र | महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास (History of Social Reformers in Maharashtra ) |
| 4 | भूगोल/शारीरिक शिक्षण | लोक प्रशासन (Public Administration) |

**ऐच्छिक विषय (Optional )**

**गट अ** – मराठी, हिंदी, इंग्रजी **गट ब** – अर्थशास्त्र, इतिहास

**गट क** – राज्यशास्त्र, भूगोल

**Certificate Course:**

Certificate Course in Women's Self defenses.

Certificate Course in History of Jath State.

Certificate Course in Nursery Cum Gardener Raiser.

Certificate Course in Yoga and Meditation.

टिप : 1. बी.ए. भाग 1 मध्ये घेतलेल्या चार ऐच्छिक विषयापैकी दोन ऐच्छिक विषय (प्रत्येकी दोन पेपर) निवडावेत.

2. वरीलपैकी कोणताही 2 सर्टिफिकेट कोर्स विद्यार्थ्यांनी पूर्ण करणेचा आहे.

## • तृतीय वर्ष कला ( बी.ए भाग 3)

**आवश्यक विषय** (Compulsory) – इंग्रजी

**स्पेशल विषय –**

1) मराठी 2) हिंदी 3) इंग्रजी 4) इतिहास

5) अर्थशास्त्र 6) राज्यशास्त्र 7) भूगोल

**Certificate Courses:**

- Certificate Course in Functional English
- Certificate Course in Effective communication in English.
- Certificate Course in Travel and tourism
- Certificate Course in Introduction to GPS and GIS.
- Certificate Course in Proof reading.
- Certificate Course in Research methodology and data analysis
- Certificate Course in Hindi Bhasha ka Udhbhav yav Vikas
- Certificate Course in Museology
- Certificate Course in Areheology

टिप : 1. बी.ए. भाग 2 मध्ये घेतलेल्या दोन ऐच्छिक विषयांपैकी एक विषय स्पेशल विषय म्हणून बी.ए. भाग 3 साठी निवडता येतो.

2. वरीलपैकी कमीत कमी कोणताही 1 सर्टिफिकेट कोर्स विद्यार्थ्यांनी पूर्ण करणेचा आहे.

# ▪ वाणिज्य शाखा ( Commerce Faculty)

## • बी.कॉम भाग – 1

1) English - Paper I ( Business Communication )
2) Marathi / Principle of Marketing
3) Insurance
4) Business Economics
5) Principles of Business Management
6) Financial Accounting

Non- Credit self study course (Compulsory Civic Course)

**सत्र 1**

Compulsory Civic Course: Democracy Elections and Good Governance

**Certificate Course:**

Certificate Course in Human Rights

सत्र 2

Skill Development Course ( SDC):

Á Personality Development

**Certificate Course:**

Certificate Course  in Indian Constitutaion

- **बी.कॉम भाग – 2**

1) English Paper II  ( English for Communication )
2) Environmental Studies
3) Business Statistics
4) Corporate Accounting
5) Fundamental of Entreprenurship
6) Business Economics
7) Money and Financial System

**Certificate Course:**

- Certificate Course  in Women's self defence.
- Certificate Course in Advanced computational accounting using Tally..
- Certificate Course  in Garden cum Nursary raiser.
- Certificate Course  in Yoga and meditation.

यापैकी कमीत कमी कोणताही 1 कोर्स पूर्ण करावयाचा आहे.

- **बी.कॉम भाग – 3**

1) Business Environment
2) Business Regulatory Framework
3) Modern Mangement Practices
4) Advanced Accountancy Paper I & II

OR

5) I ndurstrial Management  Paper I & II

**Certificate Course:**

1. Certificate Course in GST
2. Certificate Course in Tally ERP9.

## ▪ Science Faculty (विज्ञान शाखा)

- **B.Sc Part- I**

**Compulsory Subject :**

1. **English**

Certificate Course: Certificate Course in Human Rights

1. SEMESTER-I:

Compulsory Civic Course : Democracy Elections and Good Governance:

2. SEMESTER-II:

Skill Development Course (SDC): Yoga and Physical Management.

## Optional Subjects :

खालील पैकी कोणताही एक A किंवा B ग्रुप निवडावा लागेल.

| **A Group** | **B Group** |
|---|---|
| 1 Chemistry **or** Computer Science | 1. Chemistry **or** Computer Science |
| 2 Physics | 2 Physics |
| 3 Mathematics | 3 Botany |
| 4 Statistics | 4 Zoology |

सत्र 1

**Compulsory Civic Course:** Democracy Elections and Good Governance

**Certificate Course:**

Certificate Course in Human Rights.

**सत्र 2**

Skill Development Course ( SDC): Á Personality Development

**Certificate Course:**

- Certificate Course in Indian Constitutaion.

टिप : Computer Science हा विषय विनाअनुदानित असलेने जादा फी भरावी लागेल.

- **B.Sc Part- II**

Compulsory Subject : Environmental Studies

Optional Subjects :

खालील पैकी कोणताही एक ग्रुप निवडावा लागेल.

1. **Group- A**: Physics, Chemistry, Mathematics
2. **Group- B**: Physics, Mathematics, Statistics
3. **Group- C**: Physics, Mathematics, Computer Science
4. **Group- D**: Chemistry, Botany, Zoology
5. **Group- E**: Botany, Zoology, Computer Science

**Certificate Courses:**

Certificate Course in Women's Self defenses.

Certificate Course in Medical Laboratory technician.

Certificate Course in Garden cum Nursary raiser.

Certificate Course in Yoga and meditation.

Certificate Course in Medical Laboratory Techniques.

Certificate Course in MS Excel: Basic to Advances.

- वरीलपैकी कमीत कमी कोणताही 1 सर्टिफिकेट कोर्स विद्यार्थ्यांनी पूर्ण करणेचा आहे.

- **B.Sc Part- III**

Compulsory Subject: English

Optional Subjects

1) Chemistry 2) Physics

3) Zoology 4) Mathematics

**Certificate Course:**

1. Certificate Course in Electronic Equipment assembly.
2. Certificate Course in Self-Cleaning Solar Cell Panels.
3. Certificate Course in Soil and Water Analysis.
4. Certificate Course in Preparation of Household Chemicals.
5. Certificate Course in Sericulture.
6. Certificate Course in Vermi composting.
7. Certificate Course in Mathematical Computation using Python.
8. Certificate Course in Mathematics for Competitive Examination.
9. Certificate Course in Identification, Cultivation and Conservation of Medicinal Plants.

टिपःरू 1 बी.एस्सी भाग 2 ला घेतलेल्या ऐच्छिक विषयांपैकी कोणताही एक विषय निवडता येईल

3. वरीलपैकी कमीत कमी कोणताही 1 सर्टिफिकेट कोर्स विद्यार्थ्यांनी पूर्ण करणेचा आहे.

# B.C.A. Faculty

## BCA-I (Sem-I&II)

| Sr.No | Sem-I Subjects | Sr.No | Sem-II Subjects |
|---|---|---|---|
| 1 | Fundamentals of Computer | 1 | DBMS |
| 2 | Introduction to Programming Using C | 2 | Operating System |
| 3 | Principles of Management | 3 | Object Oriented Programming UsingC++ |
| 4 | Business Communication | 4 | Financial Accounting with Tally |
| 5 | Office Automation | 5 | Mathematical Foundations for Computer Applications |
| 6 | Certificate Course in Computer Data entry Operator | | |

## BCA-II (Sem-III&IV)

| Sr.No | Sem-III Subjects | Sr.No | Sem-IV Subjects |
|---|---|---|---|
| 1 | Web Technology | 1 | DBMS |
| 2 | Computer Network and Internet | 2 | Operating System |
| 3 | Data Structure using C | 3 | Object Oriented Programming UsingC++ |
| 4 | Elements of Statistics | 4 | Financial Accounting with Tally |
| 5 | Human Resource Management and Materials Management | 5 | Mathematical Foundations for Computer Applications |
| 6 | Certificate Course in Web Designing & Multimedia management | | |

## BCA-III (Sem-V&VI)

| Sr.No | Sem-V Subjects | Sr.No | Sem-VI Subjects |
|---|---|---|---|
| 1 | Java Programming | 1 | Cloud Computing |
| 2 | Data Warehousing and Data Mining | 2 | Elective-I<br>1. Internet of Things (IoT)<br>2. Android Programming<br>3. R Programming |
| 3 | IT Security | 3 | Elective-II<br>1. IT Management<br>2. ERP<br>3. M - Commerce |
| 4 | Elective-I<br>1. Python Programming<br>2. C# Dot Net<br>3. Ethical Hacking | 4 | Soft Skills & Personality Development |
| 5 | Elective-II<br>1. Digital Marketing<br>2. Management Information System<br>3. Knowledge Management | 5 | ---- |
| 6 | Certificate Course in Cyber Security & Ethical Hacking | | |

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

Raje Ramrao Mahavidyalaya, Jath Dist-Sangli

**Fee Structure UG (B.A & B.Com) 2023-24**

| Sr.No | Items | B.A & B.Com I | | | | B.A & B.Com II | | | | B.A & B.Com III | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Sholrship | EBC (Open) | Paying | Non Grant | Sholrship | EBC (Open) | Paying | Non Grant | Sholrship | EBC (Open) | Paying | Non Grant |
| 1 | Admission Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 2 | Accident/Medical help Fund | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 3 | Apthkalin Nidhi | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 4 | Ashwamedh Nidhi | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 5 | Agrani college Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 6 | Bonafide Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 7 | Borrow Card | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 8 | CIE fee | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 9 | College Magazine Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 10 | Certificate Course | 100 | 100 | 100 | 100 | 300 | 300 | 300 | 300 | 500 | 500 | 500 | 500 |
| 11 | E Suvidha | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 12 | Eligibility Fee | 75 | 75 | 75 | 75 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 13 | Enviornment Fee | 0 | 0 | 0 | 0 | 275 | 275 | 275 | 275 | 0 | 0 | 0 | 0 |
| 14 | Gymkhana Fee | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 |
| 15 | Identity Card | 50 | 50 | 50 | 50 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 16 | Jubilee Fund | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 17 | Kalyan Nidhi | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 18 | Laboratory Fee (Geography & English) | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 19 | Library Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 0 | 100 | 100 | 100 | 100 |
| 20 | Student Aid Fund | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 21 | Software Fee | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 22 | Self Finance Unit | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 23 | Tution Fee | 0 | 0 | 800 | 5300 | 0 | 0 | 800 | 5300 | 0 | 0 | 800 | 5300 |
| 24 | Uni. Pro-Reta | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 25 | Uni. Youth Festival | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 |
| 26 | Vikas Nidhi | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 27 | Youth Hostel Nidhi | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| Total | | **1895** | **1895** | **2695** | **7195** | **2245** | **2245** | **3045** | **7445** | **2170** | **2170** | **2970** | **7470** |

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

Raje Ramrao Mahavidyalaya, Jath Dist-Sangli

**Fee Structure UG (B.Sc) 2023-24**

| Sr. No | Items | B.SC I | | | | B.SC II | | | | B.SC III | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Sholrship | EBC (Open) | Paying | Non Grant | Sholrship | EBC (Open) | Paying | Non Grant | Sholrship | EBC (Open) | Paying | Non Grant |
| 1 | Admission Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 2 | Accident/Medical help Fund | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 3 | Apthkalin Nidhi | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 4 | Agrani college Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 5 | Ashwamedh Nidhi | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 6 | Barrower card | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 7 | Bonafide Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 8 | CIE fee | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 9 | College Magazine Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 10 | Certificate Course | 100 | 100 | 100 | 100 | 300 | 300 | 300 | 300 | 500 | 500 | 500 | 500 |
| 11 | E Suvidha | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 12 | Eligibility Fee | 75 | 75 | 75 | 75 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 13 | Enviornment Fee | 0 | 0 | 0 | 0 | 275 | 275 | 275 | 275 | 0 | 0 | 0 | 0 |
| 14 | Gymkhana Fee | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 |
| 15 | Identity Card | 50 | 50 | 50 | 50 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 16 | Jubilee Fund | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 17 | Kalyan Nidhi | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 18 | Laboratory fee | 1500 | 1500 | 1500 | 1500 | 1500 | 1500 | 1500 | 1500 | 1500 | 1500 | 1500 | 1500 |
| 19 | Laboratory Deposit | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 20 | Library Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 21 | Student Aid Fund | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 22 | Software Fee | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 23 | Self Finance Unit | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 24 | Tution Fee | 0 | 0 | 800 | 11000 | 0 | 0 | 800 | 11000 | 0 | 0 | 800 | 11000 |
| 25 | Uni. Pro-Reta | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 26 | Uni. Youth Festival | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 |
| 27 | Vikas Nidhi | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 28 | Youth Hostel Nidhi | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| Total | | **3245** | **3245** | **4045** | **14245** | **3595** | **3595** | **4395** | **14595** | **3520** | **3520** | **4320** | **14520** |

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

Raje Ramrao Mahavidyalaya, Jath Dist-Sangli

**Fee Structure BCA 2023-24**

**Non-Grant**

| Sr. No | Items | B.C.A I | | B.C.A II | | B.C.A III | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | GOI(SC/ ST) | Non-Grant | GOI(SC/ ST) | Non-Grant | GOI(SC/ ST) | Non-Grant |
| 1 | Admission Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 2 | Accident/Medical help Fund | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 3 | Apthkalin Nidhi | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 4 | Agrani college Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 5 | Ashwamedh Nidhi | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 6 | Barrower card | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 7 | Bonafide Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 8 | CIE fee | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 9 | College Magazine Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 10 | Certificate Course | 100 | 100 | 300 | 300 | 500 | 500 |
| 11 | E Suvidha | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 12 | Eligibility Fee | 75 | 75 | 0 | 0 | 0 | 0 |
| 13 | Enviornment Fee | 0 | 0 | 275 | 275 | 0 | 0 |
| 14 | Gymkhana Fee | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 |
| 15 | Identity Card | 50 | 50 | 0 | 0 | 0 | 0 |
| 16 | Jubilee Fund | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 17 | Kalyan Nidhi | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 18 | Laboratory fee | 4500 | 4500 | 4500 | 4500 | 4500 | 4500 |
| 19 | Library Fee | 500 | 500 | 500 | 500 | 500 | 500 |
| 20 | Student Aid Fund | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 21 | Software Fee | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 22 | Self Finance Unit | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 23 | Tution Fee | 0 | 13500 | 0 | 13500 | 0 | 13500 |
| 24 | Uni. Pro-Reta | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 25 | Uni. Youth Festival | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 |
| 26 | Vikas Nidhi | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 27 | Youth Hostel Nidhi | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| **Total** | | **6650** | **20150** | **7000** | **20500** | **6925** | **20425** |

**SC/ST-** प्रवर्गातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशीपचा लाभ घेता येईल.

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

Raje Ramrao Mahavidyalaya, Jat Dist-Sangli

**Fee Structure PG 2023-24**

**Non-Grant**

| Sr. No | Items | M.Sc I (Chemistry &Physics) | M.Sc II (Chemistry &Physics) |
|---|---|---|---|
| | | **Non-Grant** | **Non-Grant** |
| 1 | Admission Fee | 10 | 10 |
| 2 | Accident/Medical help Fund | 20 | 20 |
| 3 | Apthkalin Nidhi | 10 | 10 |
| 4 | Agrani college Fee | 25 | 25 |
| 5 | Ashwamedh Nidhi | 30 | 30 |
| 6 | Barrower card | 25 | 25 |
| 7 | Bonafide Fee | 25 | 25 |
| 8 | Caution deposit | 10 | 10 |
| 9 | CIE | 500 | 500 |
| 10 | College Magazine Fee | 100 | 100 |
| 11 | Conference fee | 1000 | 1000 |
| 12 | Certificate Course | 1000 | 1000 |
| 13 | E Suvidha | 1000 | 1000 |
| 14 | Eligibility Fee | 50 | 0 |
| 15 | Gymkhana Fee | 250 | 250 |
| 16 | Identity Card | 50 | 0 |
| 17 | Internet Fee | 1000 | 1000 |
| 18 | Jubilee Fund | 25 | 25 |
| 19 | Laboratory fee | 10000 | 10000 |
| 20 | Laboratory deposit | 200 | 200 |
| 21 | Library Fee | 200 | 200 |
| 22 | Project work fee | 0 | 2000 |
| 23 | Student Aid Fund | 50 | 50 |
| 24 | Student development fund | 50 | 50 |
| 25 | Software Fee | 200 | 200 |
| 26 | Self Finance Unit | 10 | 10 |
| 27 | Tution Fee | 30000 | 30000 |
| 28 | Uni. Pro-Reta | 30 | 30 |
| 29 | Uni. Youth Festival | 65 | 65 |
| 30 | Youth Hostel Nidhi | 50 | 50 |
| 30 | Kalyan Nidhi | 100 | 100 |
| **Total** | | **46085** | **47985** |